देशोन्नती

स्वर्गीय पांडुरंगजी तुळसकर यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन



हिंगणघाट: पांडुरंगतुळसकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, हेल्थ चेकअप कमिटी, एचडीएफसी बँक शाखा हिंगणघाट आणि जीवनज्योती ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय पांडुरंग तुळसकर यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा मातोश्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून एचडीएफसी बँकेचे शाखा प्रबंधक श्रीकांत सोलनकर उपस्थित होते. यावेळी विद्या विकास संस्थेचे सहसचिव विजय ईटनकर, टी.आय.सी.चे प्राचार्य डॉ. राजविलास कारमोरे, तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. महेंद्र गुंडे, ब्रिलियंट सीबीएसई स्कुलचे प्राचार्य विलास राऊत, विद्या विकास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नितेश रोडे, मातोश्री महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सपना जयस्वाल उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर स्वर्गीय पांडुरंगजी तुळसकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्या विकास कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नितेश रोडे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक श्रीकांत सोनवलकर यांनी रक्तदानाचे महत्त्व विशद करताना विद्यार्थ्यांमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. उमेश तुळसकर यांनी स्वर्गीय पांडुरंग तुळसकर यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचे स्मरण केले. रक्तदानाचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने सामाजिक जाणीव ठेवून अशा सेवाभावी उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर आणि तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. महेंद्र गुंडे यांनी स्वतः रक्तदान करून उपस्थितांसमोर आदर्श निर्माण केला. या शिबिरात एकूण ४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदानातून अनेकांचे प्राण वाचविता येतात, हा मानवतेचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. भाग्यश्री साबळे यांनी केले. आभार उपप्राचार्या डॉ. सपना जयस्वाल यांनी मानले. रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी प्रा. मीनाक्षी जिडगिलवार, प्रा. अनिल मानकर, प्रा. अमित रेंढे, प्रा. स्नेहा बावणे, प्रा. शीतल कुंभारे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले. **तालुका प्रतिनिधी**

Wardha Edition
Nov 1, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com